# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

**४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.**
**दूरध्वनी : २२०२६२४९, २२८३५२४७, २२०२५३५४.(थेट)**
**फॅक्स : २२८२१२६९.**
**ई-मेल पत्ता : headquarters@mjp.gov.in**
**वेब पत्ता : mahamjp.com**


जा.क्र.मजीप्रा/सस/तांशा-२/३५०/ ८४४ ३१ ऑगस्ट, २०१५

परिपत्रक क्र. १६३

**विषय :** निविदा कलम-३ (क) खाली काम काढून घेताना अवलंबावयाच्या कार्यपध्दतीबाबत.

**संदर्भ :** या कार्यालयाचे पत्र क्र. मजीप्रा/सस/तंशा-२/३३६, दि.२३.२.२००४ अन्वये निर्गमित परिपत्र क्र.९६

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांतर्गत विविध नागरी तसेच ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या कामाचा आढावा घेतला असता, असे निदर्शनास आले आहे की, अनेक योजनांची कामे निविदेतील विहित मुदतीत पूर्ण न होता, रखडलेली आहेत. त्यामुळे योजनांचा फायदा लाभार्थिंना मिळत नाही. त्याचप्रमाणे पूर्ण झालेली उपांगेही विना वापर राहल्यामुळे त्यांचीही दुरुस्ती करण्याची आवश्यकता निर्माण होते. योजनेची लेखे-जोखे बंद होत नाहीत. त्याचप्रमाणे विविध स्तरामधील बैठकीमध्ये मजीप्राच्या कामकाजावर टिका होते.

वरील सर्व बाबी विचारात घेऊन रखडलेल्या योजना पूर्ण करण्याच्याबाबतीत आढावा बैठकीत वेळोवेळी सूचना देण्यात आल्या आहेत. या योजनांची कामे वेळेवर पूर्ण न होण्यासाठी योजनेचे ठेकेदार जबाबदार असल्यास ठेकेदारांवर दंडाची आकारणी करणे, कामे निविदा कलम ३-क अन्वये काढून घेणे या बाबतीत संदर्भीय परिपत्रकान्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

रखडलेल्या योजनांची कामे तातडीने पूर्ण करण्याची निकड विचारात घेऊन या संदर्भात खालीलप्रमाणे पुरक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१) ठेकेदार काम करण्यास मुद्दाम दिरंगाई/टाळाटाळ करीत असल्यास त्यांच्यावर निविदा कलम-२ अंतर्गत देण्यात आलेल्या अटी व शर्तीनुसार दंड आकारण्यात यावा.

२) दैनंदिन दंड आकारणी करताना, निविदेच्या अंदाजीत किमतीच्या १० टक्के इतक्या एकुण दंडाची रक्कम जास्तीत जास्त ६ महिन्यांच्या आत वसूल होईल, अशा प्रकारे करावी, म्हणजे किमान दंड {(निविदेची अंदाजित किंमत/१०) / १८० } प्रतिदिन याप्रमाणे करावी.

३) कंत्राटदाराचा दोष असुनही यापेक्षा कमी दंड आकारल्यास संबंधित अभियंता शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र रहाणार.

४) वरीलप्रमाणे कार्यवाही केल्यावरही ठेकेरांकडून उर्वरीत कामे पूर्ण करण्याबाबत कार्यवाही न झाल्यास, ठेकेदारास उर्वरित कामे निविदा कलम-३ (क) अंतर्गत काढून घेण्यात येत असल्याबाबत नोटीस देण्यात यावी.

५) उर्वरित कामे वेळेत पूर्ण करण्याच्या दृष्टीने मूळ ठेकेदाराच्या कामाची मोजमापे घेणे, उर्वरित कामांची निविदा प्रपत्रे तयार करणे, निविदा प्रसिध्द करणे इ. सर्व कार्यवाही ४५ दिवसांमध्ये पूर्ण करण्यात यावी.

31/8/15

(संतोष कुमार)
सदस्य सचिव

मजीप्रा/सस/तांशा-२/३५०/ ९४४

दिनांक : ३१.०८.२०१५

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी :

- संचालक (तांत्रिक), मजीप्रा, मुंबई
- संचालक (वित्त), मजीप्रा, सिडको भवन, नवी मुंबई
- मुख्य अभियंता, मजीप्रा,ठाणे/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
- अधीक्षक अभियंता, मजीप्रा मंडळ, ठाणे/पनवेल/पुणे/सांगली/नाशिक/ अहमदनगर/ औरंगाबाद/ नांदेड/ लातूर/ अमरावती/ नागपूर/ चंद्रपूर/ अकोला
- अधिक्षक अभियंता, म.नि.सं.व सं.कक्ष/गु.प.प.,ठाणे.

  सदर परिपत्रक मजीप्राच्या वेबसाईटमध्ये अपलोड करावे.
- कार्यकारी अभियंता (सर्व)